# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

**अंक २८/२०१९** **दिनांक ०५/०४/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. अनंतकुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ३०/०३/२०१९ ते ०५/०४/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०६/०४/२०१९ सकाळी ८:३० पासून १०/०४/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/०३ | ३१/०३ | ०१/०४ | ०२/०४ | ०३/०४ | ०४/०४ | ०५/०४ | | ०६/०४ | ०७/०४ | ०८/०४ | ०९/०४ | १०/०४ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ४२.० | ४१.० | ३८.७ | ३९.२ | ३९.६ | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३३ | ३५ | ३५ | ३६ |
| २१.२ | २४.० | २०.४ | २०.० | २१.२ | - | - | किमान तापमान (अं.से) | २५ | २४ | २४ | २३ | २३ |
| ० | ० | ० | ० | ० | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | १ | ० | ० | ० | ० |
| ८६ | ८१ | ७५ | ८० | ७९ | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७८ | ६९ | ७१ | ८० | ७५ |
| ३६ | ५० | २९ | ४२ | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४० | २८ | २८ | २९ | ३० |
| ५.६ | १.९ | १०.९ | ६.२ | ६.३ | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ३ | ४ | ४ | ५ |
| शांत | शांत | पू. | प. | नै.द. | - | - | वाऱ्याची दिशा | वा.उ. | वा.उ. | उ. | नै.द. | आ.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३५५८.३ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ६ ते १० एप्रिल २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा दर्शविण्यात आला आहे तसेच प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये कमी ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | पोटरी ते लोंबी बाहेर येण्याची अवस्था | • उन्हाळी भात पिकात लोंब्या येण्यापूर्वी दहा दिवस व लोंब्या आल्यानंतर दहा दिवसांपर्यंत शेतामध्ये पाण्याची पातळी १० सें. मी. पर्यंत ठेवावी. |
| भुईमुग | शेंगा अवस्था | • भुईमुग पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १२ मि. ली. किंवा मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही ८ मि. ली. प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता वाटल्यास दुसरी फवारणी १५ दिवसानंतर करावी. |
| आंबा | फलधारणा अवस्था (सुपारी ते अंडाकृती अवस्था) | • आंबा पिकामध्ये फळांवर भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची व त्यामुळे फळगळ होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• आंबा पिकामध्ये फळांवर फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी स्पिनोसॅड ४५ टक्के प्रवाही २.५ मि. ली. किंवा थायेमेथॉक्झाम २५ टक्के २ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी.(सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत).<br>• फलधारणा झालेल्या आंबा झाडास उपलब्धतेनुसार शक्य आहे तिथे प्रती झाडास १५ दिवसांच्या अंतराने १५० ते २०० लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• आंबा फळांचे फळमाशी पासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. उन्हाळ्यात पहिल्या वर्षी आठवडयातून दोन वेळा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून दोन वेळा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून दोन वेळा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी दयावे. |
| काजू | फलधारणा व पक्वता | • काजू पिकामध्ये काही ठिकाणी काढणी योग्य बी तयार झालेली आहेत. तयार झालेल्या बिया बोंडापासून वेगळ्या करून बिया उन्हामध्ये ७ ते ८ दिवस वाळवाव्यात. तसेच विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे काजू बोंडापासून विविध टिकावू पदार्थ तयार करावेत.<br>• नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना दर आठ दिवसांनी प्रती कलम १५ लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. |
| नारळ | - | • नारळावरील इरीओफाईड कोळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के कडूनिंबयुक्त (अझाडीराक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. समप्रमाणात पाण्यात मिसळून मुळाद्वारे एप्रिल ते मे, ऑक्टोबर ते नोव्हेंबर व जानेवारी ते फेब्रुवारी या कालावधीत वर्षातून तीन वेळा देण्यात यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळ काढू नयेत. याशिवाय नारळावर १ टक्का निमाझोल ४ मि .ली. प्रती लिटर पाण्यातून नारळाच्या घडावर पडेल अशी फवारणी करावी. फवारणी करण्यापूर्वी सर्व किडग्रस्त व तयार नारळ काढून घ्यावेत. पडलेली फळे, फुलोरा गोळा करून नष्ट करावेत. तसेच नारळास ५० किलो कंपोस्ट, १० किलो निंबोळी पेंड व झिंक, बोरॉन, मोलिब्डेनम व कॉपर हि अतिसूक्ष्म अन्नद्रव्ये २०० ग्रॅम प्रती माड दरवर्षी देण्यात यावी. |
| कांदा | वाढीची अवस्था | • कांदा पिक लागवडीनंतर ३ ते ४.५ महिन्यात काढणीस तयार होते. काढणी पूर्वी २ आठवड्याअगोदर पिकास पाणी देणे थांबवावे जेणेकरून पानातील रस कांद्यामध्ये उतरून कांदा काढणीस तयार होईल. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फुलोरा | • उन्हाळी भेंडी भाजीपाला पिकावरील पांढ्र्यामाशीच्या नियंत्रणासाठी शेतामध्ये पिवळ्या रंगाची चिकट कार्डे ८ प्रति एकर लावावीत.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे/कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या / शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल.<br>• जनावरांना पायलाग रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना लसीकरण करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**